RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक १६] शुक्रवार, मार्च २०, २०२६/फाल्गुन २९, शके १९४७ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ३५

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक २० मार्च २०२६

अधिसूचना

महाराष्ट्र माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम,१९६९.

क्रमांक युडब्ल्यूए २०२६/प्र.क्र.०७/काम-५.– ज्याअर्थी, मे.प्रविण मसालेवाले, मु. पो. भोळी, ता. खंडाळा, जिल्हा सातारा, महाराष्ट्र ४१५५२६ या आस्थापनेच्या, माल चढविणे, उतरविणे, थप्पी लावणे, वाहतूक करणे, वजन करणे, मोजणी करणे, भरणे, शिवणे, विल्हेवारी लावणे, स्वच्छ करणे किंवा अशा कामाच्या पूर्व तयारीचे किंवा तदनुषंगीक कामाशी संबंधित असंरक्षित कामगारांना ज्यांची नांवे यासोबत जोडलेल्या अनुसूची १ मधील स्तंभ (२) मध्ये दर्शविली आहेत. (यापुढे सदर "असंरक्षित कामगार" म्हणून संबोधित केले आहे.) त्यांना महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम २२ अन्वये सदर अधिनियमाच्या व त्याखालील सातारा जिल्हा माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, १९९१ (यापुढे सदर "योजना" संबोधण्यात येईल) मधील सर्व तरतुदीतून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी सदर असंरक्षित कामगारांना मिळणाऱ्या फायद्यांची तपासणी केल्यानंतर महाराष्ट्र शासनाचे असे मत आहे की, सदर अंसरक्षित कामगार ज्या सुविधांचा फायद्यांचा लाभ घेत आहेत त्या सुविधा सदर अधिनियम व योजनेद्वारे देण्यात येणाऱ्या सुविधा फायद्यांपेक्षा कमी अनुकूल नाहीत.

सबब, त्याअर्थी, महाराष्ट्र माथाडी, हमाल व इतर श्रमजीवी कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९६९ च्या कलम १४ (१) (१अ) व कलम-२२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासनाद्वारे, शासन अधिसूचना उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. युडब्ल्यूए २०२६/प्र.क्र.०७/काम-५, दिनांक १० फ़ेब्रुवारी,२०२६ अन्वये प्रसिध्द केल्यानुसार कोणतीही हरकती व सूचना प्राप्त न झाल्यामुळे मे. प्रविण मसालेवाले, मु.पो.भोळी, ता.खंडाळा, जिल्हा- सातारा, महाराष्ट्र ४१५५२६ या आस्थापनेतील सदर असंरक्षित कामगारांना सदर अधिनियम व योजनेच्या सर्व तरतुदीमध्ये यासोबतच्या अनुसूची-२ मध्ये दर्शविलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून सूट देत आहे.

अनुसूची -१

अ.क्र.	असंरक्षित कामगारांचे नाव
१.	कमलाकर जयसिंग साळुंके
२.	आबा मारुती लठठे
३.	सुनिल शांताराम रेडेकर
४.	संतनाथ नागनाथ हावळे
५.	हनुमंत जरीचंद ताबारे
६.	शिवाजी विश्वभर सुपेकर
७.	अनिल बाबासो मिसाळ
८.	आजिनाथ किसन मोकाशे
९.	सतिश किसन भांडवलकर
१०.	युवराज चिमाजी बुधावले
११.	दत्तात्रय राजाराम फरगडे
१२.	अविनाश प्रशांत रुपनवर

अनुसूची - २

१. सूट दिलेल्या आस्थापनेने व त्याच्या मालकाने सूट देण्यात आलेल्या कामगारांना माथाडी अधिनियमाच्या व त्या अंतर्गत तयार केलेल्या योजनेद्वारे दिल्या जाणारे कल्याणकारी फायद्यांपेक्षा कमी कल्याणकारी फायदे देण्यात येऊ नयेत.

२. उक्त मालक / आस्थापना यांनी सूट दिलेल्या कामगारांच्या संदर्भात दिलेल्या वेतनाचा तपशील, रजेचा तपशील तसेच उक्त आस्थापनेस लागू असलेल्या इतर कामगार कायद्यांतर्गत देण्यात येणारे कल्याणकारी फायदे तसेच सवलती यांचे दस्ताऐवज अभिलेख म्हणून जतन करावेत व सदर अभिलेख मंडळाच्या सक्षम प्राधिकरणाने मागितल्यानंतर सादर करावेत.

३. उक्त आस्थापनाने सूट दिलेल्या कामगारांना किमान वेतन अधिनियम, १९४८, वेतन प्रदान अधिनियम, १९३६, उपदान प्रदान अधिनियम, १९७२, भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२ आणि कंत्राटी कामगार अधिनियम (नियमन व निर्मूलन) अधिनियम, १९७० मधील लागू असलेल्या तरतुदीची पूर्तता करावी.

४. उक्त मालक / आस्थापना सूट दिलेल्या कामगारांना वेतन अदा करील, जे मंडळाच्या नोंदित कामगारांना दिल्या जाणाऱ्या वेतन, इतर भत्ते व इतर सेवासवलतीपेक्षा कमी नसेल.

५. उक्त मालक / आस्थापना यांनी प्रत्येक आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० जून रोजी किंवा तत्पूर्वी वार्षिक वैधानिक लेखापरीक्षण अहवाल शासनास सादर करावा.

६. **पोलीस तपासणी**.– सूट दिलेल्या आस्थापनेच्या मालकाने त्यांच्याकडे काम करीत असलेल्या माथाडी कामगारांनी भारतीय दंड विधान संहीता, १८६० अन्वये पूर्व इतिहासाबाबत पोलीस पडताळणी दाखला सदर अधिसूचना जाहीर केल्यापासून तीन महिन्याच्या आत संबंधित पोलीस प्राधिकाऱ्यांकडून मंडळास सादर केला असल्याची खात्री करून घेणे आवश्यक असेल.

७. **वेतन व इतर कायदेशीर सवलती**.– उक्त मालक आस्थापनेने सूट दिलेल्या माथाडी कामगारांचे राष्ट्रीयकृत बँकेमध्ये खाते उघडावे व सूट दिलेल्या कामगारांच्या देय वेतनाच्या रकमेइतका रेखांकित धनादेश अथवा बँक ट्रान्सफरद्वारे दर महिन्याच्या ७ तारखेपर्यंत माथाडी कामगारांना वेतन द्यावे. माथाडी कामगारांना दिलेल्या वेतनाबाबतचे सविस्तर तपशील परिशिष्ट-अ मधील विवरणपत्रामध्ये भरुन माथाडी मंडळास दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावे. मालकाने खाली दर्शविल्यापेक्षा कमी नाही असे लाभ माथाडी कामगारांना द्यावेत :-

सानुग्रह अनुदान : वेतनाच्या १० टक्के

उपदान : वेतनाच्या ४ टक्के

भरपगारी रजा : वेतनाच्या ६ टक्के

भरपगारी सुट्टी : वेतनाच्या १ टक्का

मालकाने लागू असलेल्या भविष्य निर्वाह निधी व कामगार राज्य विमा योजना इत्यादी वैधानिक लाभांच्या वजाती संबंधित प्राधिकरणाकडे जमा कराव्यात आणि त्याचे चलन माहितीसाठी मंडळास सादर करावे. मालकाने /आस्थापनाने पावत्या माथाडी कामगारांना नियमितपणे देऊन त्या संदर्भातील एकत्रित तपशील शासनास, कामगार आयुक्त कार्यालयास व माथाडी मंडळास प्रत्येक ६ महिन्यांनी सादर करावा, मालकाने त्यांच्या आस्थापनेत कार्यरत असलेल्या माथाडी कामगारांना योजनेतील तरतुदीनुसार कमी नाही असे वेतन व लाभ मिळत आहेत याची खात्री करून घेणे बंधनकारक असेल, असे न केल्यास मालक आस्थापनेस जबाबदार धरुन दिलेली सूट रद्द करण्यात येईल.

८. **अतिकालिक भत्ता** .– माथाडी कामगारांना मिळणारा अतिकालिक भत्ता हा मंडळाने नियुक्त केलेल्या माथाडी कामगारांच्या धर्तीवर त्यावेळी लागू असलेल्या दरानुसार वेतन दराच्या दुप्पट दरापेक्षा कमी नसावा.

९. **विवरणपत्र सादर करणे** .– भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनेची वर्गणी मालकाने नियमित भरुन संबंधित माथाडी कामगारांना त्यासंबंधी वेळोवेळी पावत्या द्याव्यात व प्रत्येक वर्षी तसे केल्याबाबतचा अहवाल शासनास, कामगार आयुक्त व माथाडी मंडळास द्यावा.

(१) यापूर्वीच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमा व राज्य कामगार विमा योजनेची वर्गणी भरल्याबाबतचा पुरावा शासनाकडे सदर अधिसूचना निर्गमित झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत सादर करावा, अन्यथा संबंधित माथाडी कामगारांना देण्यात आलेली सूट रद्द करण्यात येईल.

(२) **वार्षिक विवरणपत्र** .– प्रत्येक मालकाने, सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेले वार्षिक विवरणपत्र सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दरवर्षी ३० जून पर्यंत शासनास तसंच मंडळास सादर करावे, ज्यात मालकाने माथाडी कामगारांचा जमा केलेला भविष्यनिर्वाह निधी व कामगार राज्य विम्याबाबतच्या चलनाच्या प्रती व इतर तपशील असेल.

१०. **ओळखपत्र व हजेरी कार्ड देणे** .– आस्थापनेच्या मालकाने त्यांच्याकडे नियुक्ती केलेल्या माथाडी कामगारांना नियुक्त केल्यापासून ३० दिवसांच्या आत ओळखपत्र व हजेरी कार्ड देईल.

११. एखाद्या माथाडी कामगारास त्याच्या निवासस्थापासून ५० कि.मी. च्या त्रिज्येपेक्षा अधिक अंतरावर काम करण्यासाठी पाठविल्यास मालकाने त्याच्या एकूण वेतनाच्या २० टक्के रक्कम त्याला भत्ता म्हणून द्यावी.

१२. माथाडी कामगारांच्या फायद्यासंदर्भात शासनाने किंवा मंडळाने भविष्यकाळात घातलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे मालकाला बंधनकारक राहील.

१३. मालकाच्या आस्थापनेस लागू असलेल्या कामगार कायद्यांच्या तरतुदींचा अवलंब केल्याशिवाय मालक कोणत्याही कामगाराला कामावरुन कमी करणे किंवा कामावरुन काढू टाकणे किंवा कामगाराला बडतर्फ करणे या प्रकारची कोणतीही कारवाई करणार नाही.

१४. सूट दिलेल्या आस्थापनेच्या मालकाने उक्त अटी व शर्तीचा भंग केल्यास सदर मालकास अधिसूचनेन्वये दिलेली सूट रद्द करण्यास अथवा काढून घेण्यास तो पात्र राहील.

परिशिष्ट 'अ'

मालकाचे वेतन प्रदानाबाबत मंडळास सादर करावयाचे विवरणपत्र.

वेतन प्रदानांचा महिना:

मालकांचे नाव व पत्ता :

बँकेचे नाव (शाखा व पत्ता) :

अ. क्र.	माथाडी कामगाराचे नाव	धनादेश क्रमांक व दिनांक	रक्कम
(१)	(२)	(३)	(४)

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता,

(नाव व हुद्या).

नमुना 'ब'

मालकाने सादर करावयाचे वार्षिक विवरणपत्र

वार्षिक विवरणपत्राचे आर्थिक वर्ष :

दिनांक :

मालकाचे नाव व पत्ता:

अधिसूचना क्रमांक व दिनांक :

अ.क्र.	महिने (एप्रिल ते मार्च)	एकूण नियुक्त माथाडी कामगारांची संख्या	माथाडी कामगारांना अदा केलेले एकूण वेतन	सूट प्राप्त माथाडी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी खाती जमा केलेली एकूण रक्कम			सूट प्राप्त माथाडी कामगारा करिता राज्य कामगार विमा योजना खाती एकूण जमा रक्कम
				माथाडी कामगारांचा हिस्सा	मालकांचा हिस्सा	एकूण	
१	२	३	४	५	६	७	८

प्राधिकृत स्वाक्षरीकर्ता,

(नाव व हुद्या).

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

दिलीप वणिरे,
शासनाचे अवर सचिव.

INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated 20th March 2026

NOTIFICATION

MAHARASHTRA MATHADI, HAMAL AND OTHER MANUAL WORKERS (REGULATION OF EMPLOYMENT AND WELFARE) ACT, 1969.

No. UWA 2026/C.R.07/LAB-5.– Whereas M/s. Pravin Masalewale, A/P- Bholi, Taluka- Khandala, District Satara, Maharashtra 415 526 has applied for grant of exemption in respect of its establishment in respect of certain unprotected workers whose names are mentioned in column(2) of Schedule I appended hereto (hereafter referred to as "the said unprotected workers") and who are engaged in connection with loading, unloading, stacking, carrying, weighing, measuring, filling, stitching, sorting, cleaning or such other work including work preparatory or incidental to such operations carried on in it. Under section 22 of the Maharashtra Mathadi Hamal and Other Manual Workers (Regulation of Employment and Welfare) Act. 1969 (Mah. XXX of 1969) (hereinafter referred to as "the said Act") from the operation of all the provisions of the said act and the Satara Mathadi Hamal and Other Unprotected Workers (Regulations of Employment & Welfare) Scheme, 1991 (hereinafter referred to as" the said Scheme ") made thereunder.

And Whereas the Government of Maharashtra after verification of the benefits enjoyed by the said unprotected workers, is of the opinion that the said unprotected workers are in enjoyment of benefits, which are on the whole not less favourable to them than the benefits provided by and under the said Act and the said Scheme;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Section 14 (1) (1A) and Section 22 of the Maharashtra Mathadi, Hamal and Other Manual Workers (Regulation of Employment and Welfare) Act, 1969, and in pursuance of Government Notification, Industry, Energy and Labour Department No. UWA 2026/CR-07/Lab-5, dated 10th February, 2026, as no objections or suggestions have been received, hereby exempts the said unprotected workers, working in M/s. Pravin Masalewale, A/P. Bholi, Taluka Khandala, District Satara, Maharashtra 415 526 from operations of all the provisions of the said Act and the said Scheme, subject to conditions specified in Schedule II appended hereto:-

SCHEDHULE -1

Sr. No.	Name of Unprotected Workers
1.	Kamalakar Jaisingh Salunke
2.	Aba Maruti Latthe
3.	Sunil Shantaram Redekar
4.	Santnath Nagnath Havale
5.	Hanumant Jarichand Tabare
6.	Shivaji Vishwambhar Supekar
7.	Anil Babaso Misal
8.	Ajinath Kisan Mokashe
9.	Satish Kisan Bhandvalkar
10.	Yuvraj Chimaji Budhavale
11.	Dattatray Rajaram Fargade
12.	Avinash Prashant Rupanwar

SCHEDHULE -II

i. The said establishment/employer will not extend less favourable benefits to the exempted workers than those offered by the said Act and the Scheme made thereunder.

ii. The said establishment / employer shall maintain registers and records of exempted workers in their employment, relating to payment of wages and leave and other facilities provided to them under the relevant labour laws applicable to the exempted establishment and the same shall be produced before the Competent Authorities of the board, when so directed by the board.

iii. The said establishment/employer shall comply with the provisions of the Minimum Wages Act, 1948 (XI of 1948); the Payment of Gratuity Act, 1972 (XXXIX of 1972); the Employee's of Provident Fund, Miscellaneous Provisions Act, 1952 (XIX of 1952); and the Contract Labour (Regulation and Abolition) Act, 1970 (XXXVII of 1970); or any other Act as may be applicable to them, for the time being.

iv. The said establishment/employer shall make payment to the registered exempted workers employed by them, which shall not be less than the wages, other allowances and other benefit which are given to the registered workers of the Board.

v. The said establishment/employer shall submit its Yearly Statutory Audit Report to the Government on or before the 30th June after the end of every financial year.

vi. *Police Verification* .— The employer shall ensure that the Police Verification of Mathadi Workers regarding non-involvement of him in any criminal acts under Indian Penal Code,1860, to the Board from the concern Police Authority within the period of three months from the date of Notification.

vii. *Wages and other Statutory Benefits.*— Employer shall ensure that exempted Mathadi Workers shall open his account in a Nationalised Bank and employer shall remit the wages by crossed Cheque or Bank transfer to each Exempted Mathadi worker equivalent to his earned wages by 7th of every month. Statement showing details of wages paid in Annexure "A" shall submitted to the Mathadi Board by 10th of every month. The Employer shall give not less than the benefits to the Exempted Mathadi worker given below:--

EX- Gratia	:	10% of Wages
Gratuity	:	4% of Wages
Leave With Wages	:	6% of Wages
Paid Holidays	:	1% of Wages

Contributions to be deposited with the Competent Authorities in respect of various statues such as Provident Fund, E.S.I. etc. applicable to the Employer, shall be deposited by the Employer with such authority and challan thereof be submitted to the Board for information. The Employer should give regular receipt to the Mathadi worker and submit a consolidated report of the above said transactions to the Government, the Commissioner of Labour and the Mathadi Board every year. The Employer, in turn, shall ensure that the Mathadi workers employed at his establishment are getting wages and benefits not less favourable than those available under the Scheme. In case of default, the Employer shall be held responsible and shall be liable for cancellation of exemption.

viii. *Overtime Allowances.*— Overtime Allowance should not be less than double the rates of wages existing at that time on the analogy of the Mathadi worker employed by the Mathadi Board.

ix. *Filing of Returns.*—

I. The Employer should make regular contribution of Employees' Provident Fund and ESIC (Where said act is applicable) of the concerned Mathadi workers and give regular Receipts to the Mathadi worker and submit a consolidated report of the above said transaction to the Government, the Commissioner of Labour and Mathadi Board every year.

II. The Employer should submit proof of the previous contributions of Employees Provident Fund and ESIC within a period of three months from the date of publication of this Notification to the Government. Otherwise the exemption given to the concerned Mathadi Workers will be cancelled.

III. *Annual return.*— The Employer shall submit at Annual Return of P.F., E.S.I. duly certified by Chartered Accountant, in Annexure 'B' on or before 30th June of every year to the Government and the Board alongwith copies of Challans and other details.

x. *Issue of Identity Cards / Attendance Card.*— Every Employer shall issue identity card, to Mathadi workers engaged by them within the period of 30 days from appointment.

xi. If any Mathadi worker is asked to work beyond the radius of 50 kms. From his place of residence, the Employer shall pay an allowance @ 20% of total emoluments of such Mathadi worker.

xii. The Employer is liable to abide with any other terms and conditions, which may be imposed in favour of Mathadi worker by the Government of Maharashtra or Board in future.

xiii. No exempted Mathadi worker shall be removed/retrenched/dismissed/ terminated without following due process of labour laws applicable to the Employers Establishments.

xiv. Breach of any of above conditions by the Employer shall make Employer liable for cancellation or revocation of the exemption granted under this notification.

ANNEXURE –A

Statement to be submitted to the Mathadi Board regarding disbursement of wages.

Disbursement of wages for the month of :

Name and Address of the Employe r:

Name of the Bank (Branch and Address):

Serial No. (1)	Name of The Matahdi Workers (2)	No. And Date of The Cheque (3)	Amount (4)

Authorised Signatory,

(Name and Designation).

ANNEXURE –B

Annual Return to be submitted by Employer : **Date :**

Financial Year :

Name and Address of the Employer :

Notification No. And Date :

Registration No. of Employer with Board :

Sr. No.	Months (April To March)	Total No. of Mathadi Workers Engaged	Total Amount of Wages Paid To The Mathadi Workers	Total Amount of P.F. Deposited To The P.F. Account For The Exempted Mathadi Workers			Total Amount Deposited With E.S.I.C. For The Exempted Mathadi Workers
				Mathadi Workers Contribution	Employer Contribution	Total	
1	2	3	4	5	6	7	8

Authorised Signatory,

(Name And Designation).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DILIP VANIRE,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.